

# सद्गुरू ॥ महिमामृत ॥

।। श्री परमहंस लहानुजीनाथ प्रसन्न ।।

ॐ

# सद्‌गुरू
# ।। महिमामृत ।।

# भाव-पुष्प

अहर्निश सद्गुरुचे स्मरण करित असतांना सद्गुरु महिमामृत ग्रंथ आपणासमोर सादर करण्याची मला स्फूर्ती झाली गुरुमाउलीच्या महिमेचे प्रेम व आठवण निरंतर जागती ठेवून प्राप्त ज्ञान व्यक्तीत्वात न ठेवता समष्टीत समरस व्हावे,अर्थातच ते जनता जनार्दनास उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हा ग्रंथ सादर करित आहे. आपल्या फावल्या वेळात या ग्रंथाचे वाचन, मनन नियमित रुपाने सर्वकाळ, व्हावे हे करतांना गुरुच्या महिमाज्ञानाचा उद्भव बुध्दीमध्ये एकरस होऊन बुध्दीला नाविण्य प्राप्त होईल व आपणांस आत्म समाधान लाभेल. आपला जीव पुर्वजन्माच्या फेऱ्याने दोषीत असल्यामुळे सुख, दुःख, उपद्रव हानी, लाभ, हर्ष शोक वगैरे कामक्रोधादिक द्वंदभावाने परि छिन्न पावलेला असतो. त्या जीवाला या सर्व वेदनेपासून अलिप्त ठेवण्याकरिता व स्वतःच्या सुखसमाधाना करिता गुरुमहिमामृताचे शुध्द आचाराने व भावनेने पठन,मनन करावे, तेव्हांच आपणांस फल प्राप्ती होईल.

या ग्रंथात शुध्द मुमुक्षत्व, प्रतिष्ठत्व, दास्यत्व, गुरुत्व शास्त्रानुभूतीचे ज्ञान थोडक्यात कथन केलेले आढळेल तसेच शुध्द शास्त्रप्रचीती, गुरुप्रचिती व आत्मप्रचितीचेही ज्ञान प्राप्त होईल. व्यवहारातूनच ही आठवण मनात जागती ठेवाल नि:शंक, शांत, सौख्य, मंगलमय वातावरण निर्माण होईल. व्याधी, उपाधी रहित असलेला सद्गुरुचा महिमा अगाध व अवर्णनीय आहे. त्याचा लाभ प्राप्त करणे हेच जीवित कार्य आहे. अनंत जन्माच्या दोषाचे बंधन दूर करुन जीवनाचे खरे साम्राज्य प्राप्त करण्यासाठी याचा लाभ निरंतर मिळत राहिल. भाविकांनी या महिमामृताचे श्रवण,मनन व आचरण नित्य नियमाने केल्यास त्यांची दिव्यज्योत घराघरातून जागती राहिल. भक्तिचे फळ कर्मानुसार प्राप्त होऊन स्वानंदाचे दिवस उजाळावेत, हिच सदीच्छा धरुन ही भावसुमने गुरुचरणी समर्पित करित आहे.

५ एप्रिल, १९७९
पिंपळखुटा

**दासशंकर**
(श्री संत शंकर महाराज)

# लेखकाचा अल्प-परिचय

यांचा जन्म दि. १९.८.१९४५ ला पिंपळखुटा ता. धामणगांव जि. अमरावती (महा.) या लहानश्या खेड्यात अत्यंत गरीब घराण्यात झाला. मराठी चवथ्या वर्गातूनच शिक्षणाला रामराम ठोकला. देवीच्या देवळात वर्धा नदीच्या तिरावर ध्यानमग्न होवू लागले. ईश्वराला भेटण्याची लालसा बाळगतच श्री सद्गुरु लहानुजी महाराजांच्या दर्शनाला पायी जावू लागलेत. वयाचा १०-११ वर्षापासुनच लोकांना त्याच्या अतींद्रिय शक्तीचा साक्षात्कार घडू लागला. दैनंदिन व्यवहारात या बालकाच्या वैखरीतून निघालेले शब्द ततोतंत खरे ठरलेत. बुध्दीच्या कक्षेत न बसणाऱ्या घटना, बालकात असलेली प्रतिभा, ईश्वराविषयी जिज्ञासा, सात्विकता, छंदरहित वृत्ती व अतिंद्रीय शक्तीचा संचार या सर्व गुणामुळे प्रभावित होऊन लोक त्यांना श्रध्देनी पाहू लागलीत.

सन १९५९ ला श्री. समर्थ लहानुजी महाराजाची गुरुकृपा लाभली. **''म्हणे लहान्या हा घे डोळा। जानावे तया सर्वकाळ ।। अकल लेका भिवया निळा। स्थानी पहावे ।।''** या प्रमाणे त्यांना दिव्यज्योतीच्या प्रकाशात स्वत:चा डोळा पाहण्याचे सामर्थ्य गुरु कृपेने लाभले. बारा वर्षानंतर पूर्णत्व प्राप्त होईल, असे आशिर्वादिक शब्द श्री कडून मिळाले. ''ॐ सोहम् लहानुजीनाथ'' या मंत्राचा जप अहोरात्र चालू ठेवला. परिणामस्वरुप मायारुपी सडक पार करण्याचे सामर्थ्य निर्माण होवून नेहमीसाठी निर्विकल्प अवस्था प्राप्त झाली.

**''ज्ञानामृत''** नावाचा ग्रंथ मराठी भाषेत यांच्याकडून 'श्री' नी लिहून घेतला. आत्मज्ञानामुळे महाभारतातील युध्दाचे द्रष्टा बनलेत व गुरुदेवांकडून आलेले शब्द लेखनीद्वारे प्रगट झाले. अशा प्रकारे शुध्द मराठी भाषेत **''भगवत्गिता'** हा ग्रंथ प्रकाशित झाला. मराठी साहित्यात फार मोलाची देण जनमानवाला लाभली आहे.

॥ श्री परमहंस लहानुजीनाथ प्रसन्न ॥

**'सद्गुरुदर्शन'** या पुस्तिकेत त्यांना गुरुकृपा कशी लाभली व त्यांनी स्वत:च्या स्वरुपाशी कसे एकरुप झाले याची स्पष्ट कल्पना पहावयास मिळेल. यांच्या, **'सद्गुरु महिमांमृत '** ग्रंथात गरुमाउलीची परंपरा, सद्गुरुचे लक्षण, ढोंगी गुरु, ढोंगी शिष्य कसा असतो या विषयीचे ज्ञान कथन केले आहे या अद्वितीय ग्रंथाद्वारे आध्यात्मिक मार्ग अधिक सुलभ करुन दिला आहे.

**''सुताचिये गूंजे । आंत बाहेर नाही दुजे ।''** या म्हणीनूसार ते मानवात राहूनही स्वत:चे अस्तित्व वेगळे बाळगतात. आध्यात्मीक विषयात रस घेणारे, आदरयुक्त भाषा, मृदु व नम्र स्वभाव, सदा हसत मुख, बाह्य वेषभुषा पाहून त्यांच्या महान दिव्यत्वाची कल्पना न येता मानसाला भ्रमात टाकणारी ठरते. आध्यात्मशक्तीचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर झळकत आहे. त्यांना लाभलेल्या सहज समाधिच्या अवस्थेमुळे देही व विदेही अवस्था पाहावयास मिळते.

**परमहंस श्री समर्थ सत्यदेव महाराजांचे मार्गदर्शन** १२ वर्षे लाभले असुन त्यांच्या अर्तक्य लिलेने यांच्या आध्यात्मिक अवस्थेत नवीन चैतन्य निर्माण झाले आहे. जनमानसात यांचा परिचय ते करीत. आश्रमीय परिसरात धार्मिक परंपरा घालून दिल्यात. सत्यदेव बाबा म्हणजे यांच्या जिवनातील प्रेरणास्थान होय. अशाप्रकारे यांना दोन्ही परमहंसाची कृपा - दृष्टी जिवनात लाभली आहे अध्यात्माची तहान भागविण्यासाठी ही पानपोई आम्हासर्वांना उपलब्ध आहे. त्यांच्या वाणीतून निघालेले शब्द मार्गदर्शक ठरुन पारमार्थिक सुखाचा आनंद देणारे आहेत व ते प्राप्त करुन घेण्यातच त्यांचा अल्पपरिचय समावलेला आहे.

आपला दास

**मो. ल. सातपुते**

झेंडा चौक, महाल, नागपूर

# सद्गुरु महिमामृत

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर : । गुरु:साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नम: ॥

श्री गणेशाय नम: । श्री सरस्वतैय नम: । श्री गुरुभ्यो नम : ॥

ॐ नमो ज्ञान सागरा । चित्सुख त्रैमुर्ति अवतारा ॥
विनायका विश्वंभरा । कर्पुरगौरा तुज नमू ॥१॥
तू सकळ विघ्नांचा हर्ता । सकळ देवांचा अधिष्ठाता ॥
सकळ विद्यांचा भर्ता । परमानंदा मंगलमया ॥२॥
नमू तुज एकदंता । सकळ विद्यांचा निर्माता ॥
कवित्वमति द्यावि आता । सद्गुरु महिमा वर्णाविया ॥३॥
आता नमू ब्रह्मकुवरी । हंसा रुढ वागेश्वरी ॥
सुमति द्यावी निर्धारी । सद्गुरु महिमा थोरी वर्णाविया ॥४॥
आता नमू कुल स्वामिनी । विश्वव्यापके विश्व जननी ॥
कर ठेवोनी जंघनी । भक्तालागी रक्षिसी ॥ ५ ॥
नमू पुंडलीक वरदायिनी । विश्वव्यापके विश्वपालीनी ॥
आदी भव्य अवसानी । जग रक्षिणी तूची माय ॥ ६ ॥
तुझा पार शेषा न कळे । ब्रह्मा जाहले पोटीचे बाळे ॥
आणि वेद मौनावले । वेडे झाले पुराण ॥ ७ ॥

उपनिषदा न कळे आया । शास्त्र बोलणे केले वाया ॥
कवणा न कळे तुझी माया । पडती पाया सर्वही ॥ ८ ॥
तू चक्र चालक विश्वंभर । तू निर्गुण निराकार ॥
सगुण रुप सर्वेश्वर । देही विदेही नटलासे ॥ ९ ॥
चित्ती असो नसो भाव । दर्शने मुक्ती स्वयंमेव ॥
करुनिया त्याचा गौरव । अती हाव मानसी ॥ १० ॥
जे आवडी दर्शना येती । त्याची नकळे कवणा स्थिती ॥
त्यांचा पार देवाप्रती । न कळती निश्चये ॥ ११ ॥
जिव्हाग्री सरस्वती बैसोन । या करी ग्रंथ करवी लिखाण ॥
उत्तम अधिक किंवा न्युन । इच्छा पूर्ण तुझेचि ॥ १२ ॥
तुझी कृपा झालीया पाही । कोणतेही कार्य कठिण नाही ॥
सद्‌गुरु महिमा लवलाही । वदवी आई मम मुखे ॥ १३ ॥
जैसा धरुनि शिष्याचा हस्त । अक्षरे लिहविती पंडीत ॥
तैसेचि मजला सांप्रत । करोनि त्वरीत दावी तू ॥ १४ ॥
माझी या मनीचि आवडी । तुम्ही पुरवावी घडोघडी ॥
सद्‌गुरु महिमा अमृत गोडी । देई तातडी आताचि ॥ १५ ॥
मंद बुध्दीशी प्रेरक । तूचि असशी वरदायक ॥
ग्रंथ वदवि भवतारक । माझिया एक मुरारी तू ॥ १६ ॥

मागे भक्त वर्णियले बहुत । निवृत्ती ज्ञानदेव संतमहंत ॥
सोपान मुक्ताबाई विख्यात । एकनाथ कबीर नामदेव ॥ १७ ॥
तू दयाळू रुख्मीणीवर । शिरी ठेवी गा अभय कर ॥
ग्रंथ वदवि तू प्रियकर । कथा सुंदर वदवि आता ॥ १८ ॥
नवीन भक्त बहुत झाले । ठायी ठायी संचले ॥
परी तयांचे गुणानुवाद आगळे । वर्णू बळे मंदमती ॥ १९ ॥
संत गुरु भक्तांचे महिमान । कवण करु शकेल वर्णन ॥
माहिती नसता जाण । मन उद्विग्न जाहले ॥ २० ॥
परी बुध्दी दाता कैलाशपति । आज्ञा दिधलीसे मजप्रती ॥
ग्रंथ वदविरे निश्चिती । आदी अंती मज सावरी ॥ २१ ॥
ऐसा भास होता माझे चित्ती । तत्काळ हर्षित जाहली मती ॥
परी एक नवल निश्चिती । तेचि श्रोते ऐकावे ॥ २२ ॥
मी अनाथ की दुर्बळ । मज कैसे कोणते बळ ॥
ग्रंथ वदीन की प्रांजळ । काळ वेळ कोणती ॥ २३ ॥
कवणा अंगि सामर्थ्य असे । कवण पुण्य मनी वसे ॥
कवण सेवा घडली असे । असे मानसी विचारी ॥ २४ ॥
मनी विचारुनी पाहे । तो सत्कर्म शुन्यचि आहे ॥
असत् कर्मे ते लवलाहे । घडिली पाहे आजवरी ॥ २५ ॥


नव्हते घडले संत सेवन । नाही घडले तिर्थाटन ॥
किंचित घडले देहाभिमान । सन्निध येऊनी उभा ठाके ॥ २६ ॥
आता कैसे काय करु । कैसा मनासी धीर धरु ॥
तू तव कृपेचा सागरु । करी पारु भव नदी ॥ २७ ॥
मज अहंकारे नाडीले । माया नदीत बुडविले ॥
मद मत्सरा जोडिले । वाढविले अज्ञान पणे ॥ २८ ॥
महिमतीने ग्रंथ केला । तोचि हावा मनी धरिला ॥
तरी सुर्योपमा खाद्योत्याला । कैसी दिधला जाईल हो ॥ २९ ॥
आकाशीच्या रोहिनी पती । तोचि चंद्र लिहला भिंती ॥
की चर्मक गृहीचा हत्ती । आणि ऐरावती इंद्राचा ॥ ३० ॥
कुबेर कवडी एकराशी । कैसी उपमा शोभे त्यासी ॥
सौदामिनी आणि सुभद्रेसी । साम्य तेसी मिळेल की ॥ ३१ ॥
की पृथ्वीपति राजयांनी । जी जी ईच्छा धरिली मनी ॥
तीच इतर दीन जनी । ठाव धरुनी बैसावे की ॥ ३२ ॥
देव अमृत पान करीती । तीच ईच्छा धरिली भूती ॥
ऐसे घडेचिना कल्पांती । अती प्रिती धरिता पा ॥ ३३ ॥

की कुलीन जनाचे मानस । आवडी प्राशु सुधारस ॥
बहुत करिताची साह्यास । परी तयांस प्राप्त नोहे ॥ ३४ ॥
तैसी माझी ईच्छा झाली । की आवडी वर्णू संतावळी ॥
तरी माझी अवश्य बोली । कैसी मानल्या जाईल हो ॥ ३५ ॥
ऐसा अधिकार न विचारता मनी । कैसी हाती धरिली लेखणी ॥
सर्व लज्ञा मोह सोडूनी । करी वाहनी प्रवेशु आता ॥ ३६ ॥
काही शुरत्व अंगि असते । तरी वाहनी प्रवेशु नरुते ॥
आता वाहन खावू निश्चिते । ऐसे वाटतसे मजलागी ॥ ३७ ॥
संत सद्गुरुचि वाहान । ही सुरासी दुर्लभ जाण ॥
मग असुरासी कोठून । मिळेल जाण कैसी ती ? ॥ ३८ ॥
तरी दयाळू कैलासपती । कृपाळू बा आदिमुर्ती ॥
न पहावी माझी स्थिति । तू गौरीपती विश्वेशा ॥ ३९ ॥
अजामिळ पापरासी । तोहि गेला वैकुंठासी ॥
उध्दरीले गणिकेसी । सायुज्ञासी अधिकार दिला ॥ ४० ॥
उपमन्यू द्विजबाळ । त्याने घेतली होती आळ ॥
दुग्ध मागे उतावेळ । घोटी लाळ आवडी ॥ ४१ ॥
त्यांचे इच्छित पुरविले । क्षिरसागरी बैसविले ॥
अद्यापि असे संचले । हेतु पुरविले बहुतांचे ॥ ४२ ॥

गजेंद्रा नक्र गांजिता । केले धावणे अनंता ॥
टिटविचे अंडे तत्वता । रण भूमिसी रक्षिले ॥ ४३ ॥
ऐसी बहुतांनी आळ घेतली । ती तू सर्वही सिध्दिस नेली ॥
आता माझी अवश्य बोली । कां न ऐकिसी गा भगवंता ॥ ४४ ॥
म्हणसी मतीमंद बुध्दिहीन । काय करसी रे लेखन ॥
तूज अधिकार नाही जाण । ग्रंथ निर्माण करावया ॥ ४५ ॥
नाही ज्ञान पुराण व्युत्पत्ती । नाही वेदशास्त्र श्रृतिनिती ॥
वाचा संस्कार निगुती । रती पुरती असेना ॥ ४६ ॥
नाही कर्म अकर्म माहिती । नाही निघाली देहाची भ्रांती ॥
सदा अहंकार वाहे चित्ती । अती प्रिती आवडी ॥ ४७ ॥
तू अधिकारी दुर्मती । तुज अधिकार देऊं निश्चिती ॥
हे तो न घडे कल्पांती । ऐसे श्रीपती म्हणशील की ॥ ४८॥
तरी मी अनाधिकारी खरा । परी विनंती ऐकावी दातारा ॥
तुझे गुणानुवाद अक्षरा । पत्री विश्वभरा लिहीलेसे ॥ ४९ ॥
तू क्षर ना अक्षर पाही । परी कागजी अक्षरे लिहीही ॥
म्हणोनि अक्षराची नामे तीही । तुज निश्चियी शोभत ॥ ५० ॥
जे जे भक्त नाम दिधले । ते ते सर्वही शोभिले ॥
अनंत नामे आळविले । परी वेगळेपणे राहसी ॥ ५१ ॥

तरी आता विश्वनायका । माझा अंत पाहू नका ।।
अधिकार द्यावा निका । कथा नका वदावया ।। ५२ ।।
येथे अधिकार माझा नाही । तरी बुध्दीदाता तुचि पाही ।।
म्हणोनि गुरुमहिमा निश्चयी । वदवी आई मज मुखे ।। ५३ ।।
नाम घेता तुझे आवडी । पापी उध्दरिले अनंत कोटी ।।
त्यात एक मी अंशदीन वेडी । घालीतो पदी लोटांगण ।। ५४ ।।
श्वानासी बळे हांकीता पाही । तरी द्वार सोडीत नाही ।।
तैसा मी श्वानरुपी मानव देही । लंड स्वत:ही जाहलो ।। ५५ ।।
तरी आता दिनोद्धारा । दासालागी कृपा करा ।।
मज अहंकार पामरा । सांग खरा कैसेनि ।। ५६ ।।
जरि मज अहंकार आला । तरी काय तू निर्बळ जाहला ।।
क्षणे भूगोल रचिला । क्षिणविला विधाता ।। ५७ ।।
आता न बोलवे माझ्यानी । खुंटीत झाली माझी वाणी ।।
शेषांची जिव्हा चिरोनी । भाग दोन्ही जाहले ।। ५८ ।।
ऐसे स्तवन करिता । दया उपजली सद्गुरुनाथा ।।
बुध्दि प्रेरक साम्यता । दीन दाता आवडी ।। ५९ ।।
चित्त वृत्ति आनंदीली ।अंगि रोमांचे दाटली ।।
वाग्वल्ली विस्तारली । प्रसरली चोहोकडे ।। ६० ।।

लावोनी नेत्र पाती । हृदयी आठविली सद्गुरुमुर्ती ॥
मुरोनिया चित्तवृत्ती । सहज स्थीती समाधी ॥ ६१ ॥
देह भाव नुरे ठाव । हृदयी आठविला गुरुदेव ।
वृत्ती झाली स्वयंमेव । अवयव स्थित होऊनी ॥ ६२ ॥
ऐसी सर्व रजनी गेली । सूर्यप्रभा प्रकाशली ॥
समाधी ग्रासुनि तये वेळी । सावध केली चित्तवृत्ती ॥ ६३ ॥
सद्गुरुने धरुनिया कर । म्हणे ग्रंथ लिहीरे सत्वर ॥
गुरुभक्त महिमा थोर । पावतील पैल तीर वाचता वर्तता ॥ ६४ ॥
संत भक्तांचे महिमान । कवण करु शके वर्णन ॥
भावे करिता नामस्मरण । भव बंधन कैचे तया ॥ ६५ ॥
ऐसे म्हणोनी या ग्रंथासी वर । वाचक हो दिधला निरंतर ॥
जे मज बोलवतील पुढे गुरुवर । तेचि सत्वर लिहील जाण ॥ ६६ ॥




# गुरुवर्य मायबाई प्रतिष्ठा
# पुष्प समर्पणमस्तुः

वसिष्ठे पूर्वेस आर्वी शहर। पवित्र ते साधुसंतांचे माहेर ॥
होवोनिया गेली योगीनीश्वर। मायबाई गुरुवर्या ॥ १ ॥
जिच्या जिव्हाग्री वेद जाणा। नित्य पूजा पाठादी योग साधना ॥
यम नियमादि अभ्यास नाना। अष्टांगादि सर्व ही ॥ २ ॥
वाचे 'हरि हरि ' उच्चार। प्रसन्न असे शार्ङ्गधर ॥
जैसा द्रौपदी पुरवी वस्त्र भार। संकटी धोवोनिया ॥ ३ ॥
तैसे मायबाईच्या उत्सव पंगती। धृत संपन्न झाले असती ॥
हांक ऐकीता तो जगद्पती। आणुनी देती स्वयें ॥ ४ ॥

पंढरपुर क्षेत्राची वारी । करीत आलीस आयुष्यभरी ॥
मंत्र वाचे 'हरि हरि' । नेम निर्धारी चालविले ॥ ५ ॥
तुझेचि महा सामर्थ्याने । निर्जीवासही प्राण येणे ॥
नव्हे तो महीमा सामान्य । ब्रह्म सत्येचा ॥ ६ ॥
जैसी, व्हावी उपासना । तैसेचि करवी रुक्मिणी रमणा ॥
रेडाही वदवी वेद जाणा । संत कृपे ॥ ७ ॥
ऐसी संतांची कृपा होता । आडकुजीस लाभे ब्रह्मसत्ता ॥
मायबाईच्या वरद हस्ता । भान विरले देहाचे ॥ ८ ॥
परीस न पाही लोहा दोष । स्पर्शता कनक होय तद्रुप ॥
की, सरिता सागरास । तद्रुप जाली तेधवां ॥ ९ ॥
लवण उदकासी होता सम । तद्रुप रिधे देहभान ॥
की, होता गभस्ती प्रकाशमान । नक्ष कळा फांकिल्या ॥ १० ॥
तैसे मायबाई कृपे करुन । आडकोजी जाहले ब्रह्मसनातन ॥
विदेह स्थिती सहज पावन । करियले क्षणमात्रे ॥ ११ ॥
तू विश्वचि ज्ञान आई । तुज कृपे ब्रह्मरुप झाले विदेही ॥

काय वर्णू विश्वंभरे निरामयी । माझीये आई जगदंबे ॥ १२ ॥
ऐसा थोर तुझा अधिकार । काय वर्णू मी किंकर ॥
अगाध ज्ञानाचे आगर । स्वछंदे दावियले ॥ १३ ॥
अल्पमते तुझे गुण । वर्णियले अभिमान सांडून ॥
माझीये हृदयी स्थापून । पुजियले तुज जीवेभावे ॥ १४ ॥
अगम्य तुझी थोरी । सर्व साक्षी चराचरी ॥
सद्‌बुध्दि देईजे निर्धारी । ग्रंथ वचन वदावया ॥ १५ ॥
ग्रंथ रचनेची आर्त । मने घेतली स्फुर्त ॥
निर्विघ्ने करी सावचिन्त । हेचि विनवणी तुज लागी ॥ १६ ॥



# श्री गुरु समर्थ आडकुजी महाराज प्रतिष्ठा पुष्पार्पणमस्तुः

ॐ आडकुजी स्वरुप सागरा। निरंजना निर्वीकारा ॥
भक्त प्रतिष्ठे रुप साकारा। धरियेलासी ॥ १ ॥
तुझिया स्मरणे जाण। बहुत उध्दरिले हिन दीन ॥
अनाथाचा नाथ परिपूर्ण। प्रत्यक्ष भुदेवचि पै ॥ २ ॥
भक्ती जिव्हाळा भक्तांचा। जैसा प्रेमपूर अमृताचा ॥
गहिवर गुरुदेवाचा। अहनिर्शी जाहला ॥ ३ ॥
सद्‌गुरु समर्थ आडकूजी। शिष्य तयांचे लहानुजी ॥
सत्यदेव आणि तुकडोजी। विश्वामाजी कळस जैसे ॥ ४ ॥
त्रैमुर्ति दिगांबर। ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥
की धरियला अवतार। वाटे जणू ॥ ५ ॥

सगुण निर्गुण आदि अंती । तिन्ही मुळ एकचि स्थीती ॥
वाटे मुळ स्वरुप  सर्वभुती । नटलेसे ॥ ६ ॥
हिन दिनाचे चिंतामणी । तव भक्ता स्वर्धूनी  ॥
बुडतीयांना भव्य तरणी । आश्रय देते जाहले ॥ ७ ॥
तुझे सामर्थ्य महा थोर । थुंकी लाविता उतरे विषभार ॥
की अमृत सिंचले मृतांवर । जागा होई तव कृपे ॥ ८ ॥
तू विश्वनाथा विश्वाकार । सवे श्वान जेवी निरंतर ॥
ऐसा अद्वैत अगम्य अगोचर । साक्षी जाहला सर्वांचा ॥ ९ ॥
आपुल्याची स्वच्छदे गमसी । आसनी, शयनी सर्वस्वी ॥
बोलणे वेडसर दाविसी । कळो न देसी जन  लोका ॥ १० ॥
बाहेरी शोभे पिशाच्य जना । अंतरंगी स्वच्छंदी शाहणा ॥
ब्रह्म जागवी उन्मना । निमग्न पणे सर्व काळ ॥ ११ ॥
ऐसा तुझा असे खेळ । विदेही स्फटिक जैसा निर्मळ ॥
की भ्रमर गुंजारवि परिमळ । नि:शंक केवळ सर्वथा ॥ १२ ॥
तुझा महिमा जो गायिल निर्धारी । त्यांची तुटे जन्म मरण फेरी ॥
स्वानंदे वृत्ति नर नारी । भोगती जन्मो जन्मी ॥ १३ ॥
दास हा कर जोडून । पदी घाली लोटांगण ॥
निर्विघ्न पूर्ण करावे स्तवन । महाकृपे दयाळा  ॥ १४ ॥



# ॐ श्री सत्यदेवबाबा
# प्रतिष्ठापुष्प पदार्पणमस्तुः

ॐ सत्‌गुरु सत्यदेवा । चरणी घडो अखण्ड सेवा ॥
दास प्रार्थितो जिवा भावा । निशी दिनी तुम्हांसीया ॥ १ ॥
आपल्यावाले म्हणोनि प्रिती । इशारा तुझा भक्ता प्रति ॥
आठवूनी कृत्यकृती । संबोधिती ईश्वरापरी ॥ २ ॥
जैसे वेदांती दावी साम्यपण । जळी स्थळी एकचि मनमोहन ॥
सर्व साक्षी रममाण । जाहला स्वछंदे ॥ ३ ॥
बोबडे वचनी दावोऩ । घडविले अद्‌भुत परिवर्तन ॥ ४ ॥
केले विघ्नाचे क्षालन । भक्तांचिया क्षणार्धे ॥ ४॥
कोणा क्रोधे करी वचन । जैसा तप्त जाहला चंड किरण ॥
स्पर्शु न दे चरण । तये वेळी ॥ ५ ॥

जैसा वाडवाग्नी पेटिला। तेथेचि मेघ वर्षिला ॥
अग्नी तो संतोषिला। शीतल झाला चंद्रापरी ॥ ६ ॥
ऐसे क्रिया कर्म चाले। एकांती गुरुवचन संबोधिले ॥
तेचि स्फूर्ति रुप झाले। स्वइच्छे करोनिया ॥ ७ ॥
राहणी साधी असे वरी। प्रखर ब्रह्माश्चर्य वैराग्य शरीरी ॥
इडा, पिंगळा, सुषुन्मातीरी। अखंडीत वास्तव्य मनाचे ॥ ८ ॥
तू वैराग्य भक्तीचा सुजल। योग धारकाचा तु उष : काल ॥
वृत्ति सैहज करुनि नि:श्चळ। आत्मरंगी जाहला ॥ ९ ॥
भक्ता प्रति प्रेम वाहिला। सुमार्गे ज्ञान प्रकाश दिधला ॥
रक्षा देवोनि ताप वारियला। जागविला साक्षात्कारे ॥ १० ॥
जैसा स्वयंभूची परिपूर्ण। साक्षी झाला भक्ता कारण ॥
तूचि क्रिया कर्म वर्तमान। भक्ता प्रति दावियेले ॥ ११ ॥
जैसा भजन गंगेचा लोट। की निश्चय रत्नाचा मुकुट ॥
की सत्व वैराग्याचा सुभट। दिव्य हिरा प्रगटला ॥ १२ ॥
सत्य अच्युत रुप तू सकळ। नामातीत परम निर्मळ ॥
आनंदात्माची सोज्वळ। भक्ती भावे अढळ जाहलासे ॥ १३ ॥

म्हणूनी सत्यबाबा तूज म्हणती । सत्यचि दावी सर्वासी ॥
ते न कळू देसी । कवणालागी ॥ १४ ॥
सत्य तुझा आनंद । इडा, पिंगळा सुषुन्मेचा छंद ॥
निज ध्यास परमानंद । सहज स्थिती ॥ १५ ॥
सत्यचि तुझे गुण । वर्णता न होय वर्णन ॥
पंडितही पावे शेषा समान । क्षिण तुजलागी ॥१६ ॥
ॐ सोहम आडकूजी ऐसे । गुरु मंत्र घोकी निमिषा निमिषे ॥
व्याधि पिडा भव पाशे । हरिती जनांच्या ॥ १७ ॥
या मंत्राचा अर्थ गहन । वर्णू जाता न होय वर्णन ॥
आचार प्रभावे अर्निवाच्य स्थान । पावेल याच देही । १८ ॥
या मंत्राचीये प्रभावे । मृतात्मे जनी जागवे ॥
परब्रह्मस्वरुप आगवे । सामोरा येती ॥ १९ ॥
ओंकारा जैसे शून्य स्थान । त्यातची सोहम साक्षी जान ॥
तेचि गुरुचे आद्यस्थान । मानियेले सत्यदेवे ॥ २० ॥
निर्गुण निरंजनाचा शास्ता । भावे पूजीयेला आडकूजी नाथा ॥
कृपे भ्रांति निरसोनी जागता । जाहलासी सत्यदेव ॥ २१ ॥

मंत्र जपता निमिषो निमिष। आवरोनी पंचभूतास ॥
आडकोजीच्या कृपा पदास। आरुढलासी ॥ २२ ॥
चित्ती बैसले गुरुस्मरण। अजपाजप सहज चाले प्रमाण ॥
माया मोह त्यागीलासे जाण। वमनापारी ॥ २३ ॥
जन नानापरी सुश्रृषा करिती। भक्ति ममता उपजविती ॥
तुझा छंद शुध्द परमार्थी। म्हणोनी सर्व उदासचि यालागी ॥ २४ ॥
शुध्द निर्विकल्प समाधी। त्यागोनिया माया उपाधी ॥
कृपे स्थिरावले ब्रह्मानंदी। स्वानंदी मस्त जाहला ॥ २५ ॥
महाप्रभो स्वरुप सागरा। नमन माझे सत्यदेव अवधारा ॥
जयासी लाभे तुझा चरण सहारा। तयी भवाब्दी पसारा दूर होई ॥ २६ ॥
भावपूर्ण तुझे स्तवन। कथीयलेसे जान ॥
'दास' तुझिया पदी असे शरण। अभय दान देईजे ॥ २७ ॥



## सद्‌गुरु तुकडोजी महाराज
## प्रतिष्ठा पुष्प समर्पणमस्तुः

जय जयाजी तुकडोजी सद्‌गुरु। तू सकल जीवांचा कल्पतरु ॥
तुझिया अमृत वाणीचे आधारु। पैल पारु भव नदी ॥ १ ॥
तुझा आधार भूलोकी। आश्रय घेती सद्‌विवेकी ॥
योगी, मुमुक्षु, सिध्द, साधकी। राव रंकी सर्वही ॥ २ ॥
काय वर्णू तुझा महिमा। जो तुझी सुतत्वे वर्तती प्रेमा ॥
तया नाही उपमा। बोलविया काही ॥ ३ ॥
गुरुकृपेची घेऊनी काठी। जीवाची करोनी आटा आटी ॥
ज्ञान सिध्द करवि जगजेठी। धरियेता कंठी सद्‌गुरुराव ॥ ४ ॥
गुरुदेव म्हणजे काय। तो हाडा मासाचा नोव्हे जाण ॥
गुरु नव्हे जाती संप्रदाय। गुरु शुध्द ज्ञान तत्वे पूजीयेला ॥ ५ ॥

गुरु ज्ञान अनुभवा आले । त्यांचे मन विश्वाकार झाले ॥
पंथ, पक्ष, धर्म संपले । ज्याच्या ठायी सर्वची ॥ ६ ॥
मग तो सर्वांचा झाला सखा । मानव मात्राचा पाठीराखा ॥
कोणत्याही भाषेने पारखा । तरि पावे तयासी ॥ ७ ॥
करी सद्भावना उत्पन्न । दीन दुखिताचे पालन ॥
मलीन मार्गाचे करी खंडन । काया, वाचा, मनाने ॥ ८ ॥
म्हणूनी थोरांनी कथिले । गुरुची ब्रह्मा, विष्णु झाले ॥
महेश्वर गुरुची बोलीले । याचि सामर्थ्ये ॥ ९ ॥
गुरुची ब्रह्म कथिला । सर्वास व्यापूनी गुरुची उरला ॥
ऐसा देव म्हणोनी प्रार्थीला । गुरुदेव माझा ॥ १० ॥
महापुरुष वेगळाले । परि गुरुत्वी मिळोनी गुरुची झाले ॥
व्यक्तीपण, धर्मपणही मुराले । गुरु स्वरुपि ॥ ११ ॥
त्यांचे पूजन गंधाचे नोहे । त्याचे मंदीर विशाल आहे ॥
विशालतेला मर्यादा राहे । परि गुरु त्याहून अमर्याद ॥ १२ ॥
भूमंडळ ज्याचे क्षेत्र पूर्ण । सर्व पृथ्वी जयाचे शासन ॥
चंद्र, सूर्य नंदादीप जाण । गुरुदेवांचे ॥ १३ ॥
त्यातची धर्म, पंथ सामविती । तोचि वेष्ठिला सर्वाभोवती ॥
त्या वाचोनि नाही रीति । जगा कोणी ॥ १४ ॥

त्याचे ज्ञान झालीया जीवा । कोठे द्वेष, कलह, हेवा ॥
सुख शांतीचा लाभे विसावा । सर्वा ठायी ॥ १५ ॥
म्हणोनी हेचि व्हावया ज्ञान । विशाल मने रचिले साधन ॥
सामुदायिक प्रार्थनेचे स्थान । सामुदायिक पणास्तव ॥ १६ ॥
हेचि दाविले गुरुमहिमान । ग्रामगीते माझी जाण ॥
सामुदायिक ध्यान, प्रार्थनेतून । उन्नत ज्ञान दिधले लोकी ॥ १७ ॥
युग परत्वे ग्रामगीता । सुमार्ग दावी वाचता वर्तता ॥
मग पावती स्वहीता । नारी नर ॥ १८ ॥
ग्रामगीता म्हणजे ज्ञान सागर । आंत अमोलिक रत्ने, हीरे अपार ॥
त्यात बुडी मारती चतुर । उचलोनी घेती स्वये ॥ १९ ॥
नाना पंथे, नाना पक्षी । लावियले साम्यत्वासी ॥
चराचरी तुचि गुरुदेव साक्षी । एकनिष्ठे स्थापियेला ॥ २० ॥
जनसेवा हेचि ईश्वर सेवा । मानियले जीवा भावा ॥
तत्व बोध उपदेश बरवा । जाणोनी गुरुदेवा दावियेला ॥ २१ ॥
करावयां जगी परोपकार । जैसा ज्ञान नभीचा भास्कर ॥
की, आत्मबोधाचे सागर । अवतरले जणु ॥ २२ ॥
की, पाण्याशी तद्‌रुप होता लवण । तो तेथेची जाय रिघोन ॥
की, मलयागिरीचा चंदन । लोकी सुगंध देता जाहला ॥ २३ ॥

तुझीया कवित्वे ज्ञान, दान अपार। जे वर्तती पावन तो संसार ॥
होती कर्तव्यशील नारी नर। अभेदत्व सार प्रसवती ॥ २४ ॥
तेचि जिज्ञासू, अनुरागी, विरक्त। ज्ञानाधिकारी सकल विरक्त ॥
ऐसे मर्म ग्रामगीतेत। सुलभ करुनी दावियेले ॥ २५ ॥
ऐसा सुमार्ग सर्वांशी। भूवैकुंठची व्हावे तळमळ ऐसी ॥
म्हणोनी कथियेले बहुसाधनेशी। प्राण पणासी लावियेला ॥ २६ ॥
जनसेवा करता रात्रंदिन। विराले देहाचे भान ॥
गुरुची करोनि सर्वज्ञ। जगी शुध्द ज्ञान दावियेले ॥ २७ ॥
ऐसा प्रताप तुमचा राया। गुरु आडकूजीची छाया ॥
बंधू लहानूजी, सत्यदेव राया। नमन माझे सखया तुम्हा पदीहो ॥ २८ ॥
प्रेमाश्रु करुन। तुमचे प्रक्षाळितो चरण ॥
सद्‌भक्तीचे करुन चंदन। लेपन वरी लावियेले ॥ २९ ॥
शब्द अलंकाराची पुष्पमाळ करुन। शुध्द निष्ठेचे सिंहासन ॥
प्रेम वैराग्याचे जलपान। तुम्हा पदी समर्पिले ॥ ३० ॥
ऐसी करोनी कल्पना। करितो तुमच्या या पुजना ॥
हेचि पुजन दयाधना। मान्य करा दासाचे ॥ ३१ ॥
समर्थ सद्‌गुरु तुकडोजी राया। काय अर्पावे सावरी ही माया ॥
तन-मन-धन धनादि अर्पुनिया। पदी स्तवन समर्पिले ॥ ३२ ॥

।। श्री परमहंस लहानुजीनाथ प्रसन्न ।।



# सद्गुरु समर्थ लहानुजी महाराज
# प्रतिष्ठा पुष्प समर्पणमस्तुः

जय जयाजीलहानुजी सुखकंदा । सद्गुरु तू सच्चिदानंदा ।।
देई मज ज्ञान संपदा । तुझिया नाम रचनेची ।। १ ।।
ल, हा, नु शब्दाचे वर्णन । शुध्द भावे करवि कथन ।।
दास हा लोटांगण । तुम्हा पदी गुरुराया ।। २ ।।
ॐ लहानुजी मंत्र प्रभावे । बिजत्व फळे कोणती आहे ।।
शास्त्र वचनेची सिध्द होय । तोचि गुरुराया वदवी आता ।। ३ ।।
ओंकार म्हणजे अकार, उकार, मकार । अर्ध मात्रुका मुळमाया थोर ।।
सोऽहं शून्य सर्वेश्वर । साक्षी असे दशवे द्वारी ।। ४ ।।
ओंकाराचे बिजत्व जाण । स्पष्ट होतसे वेदशास्त्र प्रवर्तन ।।
अनुभविता निराकार निर्गुण । साक्षी सनातन चराचरासी ।। ५ ।।

पुढे लहानु अक्षराचे प्रमाण । गुरुकृपे होई कथन ॥
वदवेल स्वमुखे करुन । दासा लागी ॥ ६ ॥
लहानु म्हणजे काय । कोणती बिजत्वे प्रभाव आहे ॥
जे शास्त्र वचनी सिध्द होय । तेचि ऐकावे आता ॥ ७ ॥
ल, प्रथम अक्षर प्रमाण । पंचभूती पृथ्वी तत्वाचे बिजत्व जाण ॥
आद्य चराचरी सृष्टीसी समान । योगीया जाण अवलोकिती हो ॥ ८ ॥
तयांचे रंग पितवर्ण शोभिती । चतुष्कोन आकार विराजती ॥
तेचि अक्षय योगीया, प्राणीमात्रा प्रती । सुखशांती लाभतसे ॥ ९ ॥
या 'ल', अक्षराचे करिता ध्यान । मनोरथ होतसे पुर्ण ॥
धाकुटात्मक जैसा शून्य प्रमाण । वेद वचन प्रभावितसे ॥ १० ॥
जे योगी अनुभवती । तया चक्राकार चतुष्टय पितवर्ण भासती ॥
साक्षात्कारे जागती । मस्त होती स्वानंदे ॥ ११ ॥
पुढे 'हा' शब्दाचे गुण । यामधे असे विशालपण ॥
जैसे आकाशाचे मातृ बिजत्व प्रमाण । प्रभावे जाण सामायीती ॥ १२ ॥
साधका अनुभव अग्नी चक्राचे ध्यान । द्विदल मालूकेचे प्रमाण ॥
जैसे ब्रह्मानंदाचे साक्षात्कार जाण । भिवये स्थान अनुभव ऐसा ॥ १३ ॥

या कोणी म्हणती मोक्षपुरी । शिवशक्तीची काशीपुरी ॥
सायुज्य मुक्तीच त्रिकुट शिखरी । आम्हाला लाभलीसे ॥ १४ ॥
म्हणोनीच हा शब्द निराकार एकचि गुणी । चित्र विचित्र अनेकवर्णी ॥
अनीमादी साधका सिध्दस्थानी । मोक्षगुणी जाहला ॥ १५ ॥
अनुभव घेता निष्कामची झाला । कृत कृत्यासी नुगला ॥
आत्मानुभुती रंगला । धन्य जाहला इहलोकी ॥ १६ ॥
स्वधर्मे ऐसा जागविती । धन्य तो पावे उत्तम गती ॥
आळसेन प्रवेष्ठिती । व्यर्थ जीवागती शिणलासे ॥ १७ ॥
'ह' अक्षराचे प्रमाण । वर्णीयले अल्पसे जाण ॥
पुढे 'नु' अक्षराचे प्रमाण । सांगेन थोडे आता ॥१८ ॥
'नु' अक्षराचे प्रभाव मोठे । शितल प्रेम जीवा भेटे ॥
तेणे मना समाधान वाटे । द्वैत आटे वृत्तीचे ॥ १९ ॥
'नु' शब्दे नम्रता जाण । दशमदले मातृका प्रमाण ॥
वायु तेथे नित्य समान । परावाणी सहित असे ॥ २० ॥
परावाणी भक्तीचे माहेर । जैसे दैवत विष्णूचा आधार ॥
की सप्तवारातूनी गुरुवार । अवंतीपूरची शोभतसे ॥ २१ ॥

कुंडलिनी शक्तिचे आधार । की, निळवर्ण तुरीया सत्वर ।।
प्रणवादी मात्रुका जैसा अकार । की सलोकता निरंतर शोभीतसे ।। २२ ।।
ऐसे 'नु' अक्षर अनुभवे शोधीता । भू वैकुंठपुरीच वास त्याचा ।।
महाविष्णूच जैसा परता । जाहलासी लोकामाजी ।। २३ ।।
ऐसे 'ल', 'हा', 'नु' अक्षराचे प्रभाव जाण । जैसे प्रणवादी ओंकार पूर्ण ।।
साक्षात्कार रुप प्रसन्न । तीन्ही लोकी जाहला ।। २४ ।।
म्हणोनी ओऽहं सोऽहं स्थान । त्यातचि लहानुजी घेई नाम ।।
प्रति सर्वेश्वरची पावन । सकळीकांसी ।। २५ ।।
ऐसेचि झाले माझ्या जीवना । म्हणोनिच वंदीले ते प्रेमा ।।
मंत्र ओऽहं सोऽहं लहानुजी दयाघना । सर्वकाळ ।। २६ ।।
ओऽहं  सोऽहं लहानुजीनाथ । मंत्र धोकीयले दिन रात ।।
याची गुणे पुण्य परमार्थ । मजसी लाभीयले हो ।। २७ ।।
जैसा अमंगळ उकीरडा भुवनी । कोणी न बघती तये स्थानी ।।
ऐसेचि अल्पमती दीन वाणी । बाळपणी मी राहलो ।। २८ ।।
जीवा वाटे समाधान व्हावे । म्हणोनी कवणातरी जवळी बैसावे ।।
परि तेथे काम क्रोधची आगवे । प्रत्येया येई ।। २९ ।।

ऐसे होता उदासी मन । कोठे पहावे सद्गुरुचे चरण ॥
कवणा पायी जावे शरण । मुक्ति दान लाभेल जीवा ॥ ३० ॥
पूर्व ज्ञान नसता अंगी । मानापमान जागवे संगी ॥
तेणे पिडीलो जगी । काही कळेना ॥ ३१ ॥
क्षणोक्षणी वृत्ती फिरे । कामक्रोधाचि बसती मारे ॥
तेणे जीव अति घाबरे । अज्ञानपने ॥ ३२ ॥
न कळे सेवा धर्म । न कळे पुण्य कर्म ॥
पदरी खावोनिया संभ्रम । पडलो क्षितीवरी ॥ ३३ ॥
कृषी कर्मे आरंभिलो । माया मोहे भ्रमुनी गेलो ॥
ऐसीया स्थिती लाधलो । पद कमली गुरुचे ॥ ३४ ॥
कधी करावे नित्य कर्म । कधी करावे सद्गुरु स्मरण ॥
कधी शिवाचे गायन । अत्यादरे ॥ ३५ ॥
कधी वाटे व्हावी जन सेवा । जनी जनार्दन असे बरवा ॥
सज्जन वृंद जनाचा बोलवा । पुर्वी ऐकोनिया जीवा वाटतसे ॥ ३६ ॥
ऐसी आस धरोनी । विचारीता झालो जनी ॥
न सांगे मार्ग कोणी । मजलागी हो ॥ ३७ ॥

म्हणोनी उदास होई मन । की, सोडावे घरदार सर्वही जाण ॥
वाटे व्यर्थचि हे जीण । ईश्वरा विण दिसतसे ॥ ३८ ॥
की, जावे रानी वनी । ईश्वर भेटेल म्हणोनी ॥
गिरी कंदरीच्या स्थानी । एकांत बैसोनी राहावे की ॥ ३९ ॥
कधी जावे वशिष्ठा तीरी । स्नान करण्या वेळी अवेळी ॥
शिव भेटेल कदा काळी । आर्त जवळी सांगेन की ॥ ४० ॥
तरी साक्षात्कार न होय । न कळे कर्मरेषा काय ॥
दुष्ट ग्रहांनी शिणलो वाय । न कळे तुझे पाय तोवरी ॥ ४१ ॥
अनुदिनी जाहलो उदास । नेणवेची सत्य सायास ॥
अती पडले जी प्रयास । सद्गुरु राया ॥ ४२ ॥
ऐसे करिता बहुजन्म गेले । दुर्गुण न सहावेसे झाले ॥
सर्वस्वी मन भांबावले । एकाएकी ॥ ४३ ॥
वाटे देहची त्यागावा जाण । ऐसे स्थिती होतसे जरी प्रमाण ॥
तरी न सुटे मानापमान । म्होणोनिया ॥ ४४ ॥
ऐसीया स्थिती टाकरखेड नाम नगरी । तेथे वसे संत मुरारी ॥
नाम लहानुजी अवधारी । दर्शन झाले सुदैवे ॥ ४५ ॥

बहुत दिन ऐसे जाता । अडथळा करुनी अनुभव घेता ॥
वाटे चमत्कार जना तत्वता । लहानुजीस पाहूनिया ॥ ४६ ॥
तया नावडे प्रपंची बैसणे । नावडे योग्यता मिरविणे ॥
नावडे कोणासी बोलणे । बरवे खाणे ही नावडे ॥ ४७ ॥
जन नानापरी सुश्रृषा करिती । भवती ममता उपजविती ॥
परि असे शुध्द परमार्थी । म्हणोनी मर्म गती त्या वेगळीच असे ॥ ४८ ॥
करोनी पाठ जनाकडे । मुख कमल भिंती कडे ॥
आत्मसंभाषणे भक्तांचे कोडे । सहजचि सोडीता झाले ॥ ४९ ॥
सूर्योपासनेच्या अवसरी । विरक्त तेज दृष्टीवरी ॥
'लहान्या अक्कल ' शब्द गुंजारी । कंठावरी सदोदित ॥ ५० ॥
आटवुनिया पंचभूते । द्रष्टा, दृश्य दर्शन त्रिपुटे ॥
जाणोनिया साक्ष भूते । आत्मस्वरुपी जाहला ॥ ५१ ॥
कवणा क्रोधे मार देती । कवणा तंबाखू प्रसाद देती ॥
कवणा क्रोधे स्पर्श करु न देती । चरण कमलासीया ॥ ५२ ॥
ऐसे होता दर्शनी । निराश होती अज्ञानी ॥
परि अनुभव सर्वा लागुनी । शुभची दावितसे ॥ ५३ ॥

जयाच्च्या असेल कामना । पूर्ण होती जाता दर्शना ॥
व्याधी पिडा भवरोग जाणा । वारिती सर्वांच्च्या ॥ ५४ ॥
अविस्मरणीय सदाचित्त । मानापमान समस्थित ॥
अपुल्याची छंदे रमत । सर्वकाळ ॥ ५५ ॥
ऐसा अवतरला टाकरखेडा प्रति । रम्य ऐशा वशिष्ठे काठी ॥
त्रैलोक्याचा गभस्ती । लोकी प्रकाश देता जाहला ॥ ५६ ॥
जगाचे सोसुनिया भार । कित्येक केले पदवी धर ॥
भव पिडा हरविली थोर । लाखो जनांच्या ॥ ५७ ॥
श्वासोश्वाशी मन रमले । गिण्यानमय शब्द स्फुरले ॥
सहज स्थीति राहीले । एकान्त स्थळी ॥ ५८ ॥
ऐसा तू शंकरगिर । आत्मसुखाचा सागर ॥
स्थिरावला एकविसावर । दशवे द्वार जाणोनी ॥ ५९ ॥
तू अगम्य अगोदर । सामर्थ्य जयाचे थोर ॥
की, चळवळा कापे अंबर । तपस्या जाणोनिया ॥ ६० ॥
एकान्ती बैसोनिया । दृष्टी तुझी त्रिभुवनिया ॥
कधी हंसत मुख कधी शिव्या । स्वच्छंदे भुषवी ॥ ६१ ॥

पंचवीस तत्वांचा जाणता । तो तूच की तत्वता ॥
स्थावर जंगम जीव निर्मिता । व्यापुनी आता वेगळाची तू ॥ ६२ ॥
जैसे एकचि सकळ गुणी । ओविले नाना जातीचे मणी ॥
परि सुत्र एक अभेदपणी । ऐसा तू चक्रपाणी आम्हालागी ॥ ६३ ॥
ग्रंथी ऐकीले साचार । एक कांचन नाना अलंकार ॥
तैसा तू व्यापक गुरुवर । चराचरी भरलासी ॥ ६४ ॥
तुचि संचला सर्वांचे हृदयी । सर्व व्यापुनी देही विदेही ॥
आत्मा अनात्मा सर्वही । जाहलासी तुची बापा ॥ ६५ ॥
ऐसी मुर्ती टाकरखेड्याशी अवतरली । भक्त मंडळी आनंदली ॥
जैसी स्वर्गी दुमदमली । सेना इंद्र देवतेची ॥ ६६ ॥
असो इकडे झालो मी फजित । देखिले देव धर्म अनंत ॥
न मिळेचि कोणी संत । सद्गुरुराय ॥ ६७ ॥
अनुताप स्थिती हृदयी धरोनी । गेलो मी लहानुजी चरणी ॥
नमन केले लीन होऊनी । तया समर्था ॥ ६८ ॥
म्हणे' लहान्या हा घे डोळा ' । जाणावे तया सर्वकाळा ॥
'अक्कल लेका भिवया निळा । स्थानी पहावे ॥ ६९ ॥
सडक कुदावे लागते । मग गोऱ्ह्यांचा बैल होते ॥
बारा वर्षे उपोषणाव्रते । करिता होते मग लहान्याचा ॥ ७० ॥

स्वनामा वरुनी म्हणत । लहान्याला हा डोळा देतो ॥
तयक्षणि मी लोटांगण घालीता । वरदहस्त ठेवीता झाले ॥ ७१ ॥
म्हणे कडक उन्हाळा पाहिजे । नम्र भावे मज जाणीजे ॥
तेव्हा तो होईजे । खरा लहान्यांचा ॥ ७२ ॥
कर्णी शब्दे ऐकिलो । तेथेचि सद्‌गदीत झालो ॥
रोमरोमांच दाटीले । सर्व शरीरावरी ॥ ७३ ॥
अंतर जाणोनी समर्थानी । प्रसाद तंबाखू दिधला तयक्षणी ॥
इशारा केला खालीबोट फिरवुनी । लिहीत जावे रे आता ॥ ७४ ॥
गुप्त दावियली खुण । झालो तेथेचि तल्लीन ॥
भानरुपी मंत्र जाण । स्मरण करी नेमेसी ॥ ७५ ॥
शिरी ठेविताची हस्त । झालो चरणाकमली मस्त ॥
आन न मानेची प्रशस्त । श्री लहानुजी कृपेने ॥ ७६ ॥
करुनी सद्‌गुरुचे स्मरण । कथियले सन्मार्ग ज्ञान ॥
जेणे हाती चढे निदान । गुरु महिमामृत ॥ ७७ ॥
अत्यादरे वदलो सर्वही । मते माझी नव्हती पाही ॥
मागे संती कथिले जे जे कांही । तेचि वदलो सर्वथा ॥ ७८॥
कृपा असो सद्‌गुरु राया । पदरी धरा दीनासिया ॥
आवरोनिया आपुली माया । सर्वांशी द्या निजानंद ॥ ७९ ॥

# सद्‌गुरुचे लक्षण

ऐसीया संताचे दृढ धरावे चरण । त्यांच्या वचनी विश्वास धरुन ॥
भावार्थे करावे श्रवण । नित्या नित्ये ॥ १ ॥
करिता सारासार विचार । तेणें शुध्द होय अंतर ॥
मग आत्मरुप गुरु अंर्तबाह्य चराचर । दिसु लागे सहजची ॥ २ ॥
ऐसा जो सर्वज्ञ परीपुर्ण । ज्यासी नाही ज्ञानाभिमान ॥
जो वेदाज्ञा मानी प्रमाण । त्यासी शरण जावे वेगी ॥ ३ ॥
जो सर्वज्ञ दयाळु उदास । सदाचार वृत्ती जैसा चंडास ॥
सर्वाभूती दया विशेष । तोचि सद्‌गुरु जाणावे ॥ ४ ॥
जो तरोनी दुसऱ्याते तारीता होय । शिष्यासी ब्रह्मरुप पाहे ॥
मानापमानी चित्त सम राहे । तोचि सद्‌गुरु जाणावे ॥ ५ ॥
आपण ज्यासी विद्यादान केले । ते शिष्य दुजिया शरण गेले ॥
चित्ती क्रोधे न खवळे । त्यासी शरण जावे वेगी ॥ ६ ॥
जन श्रृंगारिती निंदेचे पाषाण । पुढे केले क्षमा ओढवण ॥
मनात नुपजे दोष पुर्ण । त्यासी शरण जावे वेगी ॥ ७ ॥

पुत्राहुनी विशेष गाढे । शिष्यावरी प्रेम चढे ॥
जो शिष्या न घाली साकडे । त्यासी शरण जावे वेगी ॥ ८ ॥
वर्ते अपुल्या वर्णाश्रम मेळी । न चाले कदा वाकुडे पाऊली ॥
सदा आत्मरुपे वृत्ती रंगली । त्यासी शरण जावे वेगी ॥ ९ ॥
पिडब्रह्मांड नाशीवंत । आत्मस्वरुप एक शाश्वत ॥
हे जाणूनी सदा विरक्त । त्यासी शरण जावे वेगी ॥ १० ॥
शरीर प्रारब्धे भाग्य आले । अथवा एकदाचि सर्व बुडाले ॥
हर्षा महर्ष पंके मनन मळे । त्यासी शरण जावे वेगी ॥ ११ ॥
पिंपिलीका आणि कमळासन । इंद्र आणि दारिद्री दीन ॥
राजा, रंक अवघे समान । त्यासी शरण जावे वेगी ॥ १२ ॥
वैकुंठापासोनि नाग लोकापर्यंत । भूताकृति ज्या ज्या दिसत ॥
त्या त्या गुरुरुप भासत । त्यासी शरण जावे वेगी ॥ १३ ॥
जैसे नाना घागरी एक रांजण । त्यात भासे एक चंडकिरण ॥
तैसे ज्यासी न दिसती स्त्री पुरुष भान । त्यासी शरण जावे वेगी ॥ १४ ॥
जो बोले जनी हिंडे । परि त्याची समाधी न मोडे ॥
वाद प्रतिवाद नावडे । त्यासी शरण जावे वेगी ॥ १५ ॥

पृथ्वीचे राजे भाग्यवंत । नित्य ज्यांच्या दर्शना येत ॥
परि मी थोर हा नुपजे हेत । त्यासी शरण जावे वेगी ॥ १६ ॥
भाग्यवंतांचे करावे स्तवन । दीनदुबळ्यांचे हेळन ॥
हे ज्या पासी नाही लक्षण । त्यासी शरण जावे वेगी ॥ १७ ॥
इतुक्या लक्षणी अलंकृत । त्यावरी गुरुजनी नित्य हेत ॥
प्रेम भरे सदा डुलत । त्यासी शरण जावे वेगी ॥ १८ ॥
प्रपंच जाहला किंवा नाही । हे स्मरण नसे कांही ॥
जो बुडाला ब्रह्मानंद डोही । त्यासी शरण जावे वेगी ॥ १९ ॥
ज्यासी हरी किर्तन आवडी । संत दर्शना घाली उडी ॥
तीर्थक्षेत्र महिमा न खंडी । त्यासी शरण जावे वेगी ॥ २० ॥
इतुक्या चिन्ही मंडित पूर्ण । गुरु माझे लहानुजी जाण ॥
तयाचे चरणी घाली लोटांगण । ब्रह्मादिक जाण सर्वही ॥ २१ ॥
तोचि काळासी शासन कर्ता । अजअजित कर्ता हर्ता ॥
सकळ माया नियंता । लहानुजीनाथ सर्वकाळ ॥ २२ ॥

# शुध्द सात्विक शिष्यांचे लक्षण

ऐका सावधान। गुरुशिष्यांचे लक्षण ॥
परमात्मा आदि नारायण। तेही शरण गुरुसी रिघे ॥ १ ॥
जे तन, मन, धनेसी शरण। गुरु वचनी ज्यासी प्रमाण ॥
न पाहता गुरुचे दोष गुण। हेचि लक्षण शिष्यांचे ॥ २ ॥
गुरु सांगती तेचि आचरती। गुरु समान आपण न म्हणती ॥
दिवसेंदिवस चढे भक्ति। हेचि लक्षण शिष्यांचे ॥ ३ ॥
गुरु हा केवळ ईश्वर। मजलागी धरिला अवतार ॥
ऐसा मनी निर्धार। हेचि लक्षण शिष्यांचे ॥ ४ ॥
मी जाणता सर्वज्ञ। गुरु संन्निध न मिरवी योग्यपण ॥
घडोघडी आठवी गुरु चरण। हेचि लक्षण शिष्यांचे ॥ ५ ॥
सकळ देवाहूनि आगळे। गुरुस्वरुप जेणे निर्धारीले ॥
मन गुरुपदीच लंपट जाहले। श्रध्दाभावे ॥ ६ ॥
सारासार विचार। गुरु मुखे ऐकती निरंतर ॥
आवडे अद्वैत शास्त्र चरित्रे ईश्वर। हेचि लक्षण शिष्यांचे ॥ ७ ॥

गुरुवचना करणे सत्य । प्राण वेचावया उदित्त ॥
तेथ धनाची कायसी मात । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ ८ ॥
जे जे दिसे चराचर । ते ते गुरुरुप पाहे निर्धार ॥
गुरुवचनी नुपजे तिरस्कार । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ ९ ॥
गुरु सांगे जे हित गोष्टी । ते धरी सदा हृदय संपुष्टी ॥
प्रवृत्ती शास्त्रावरी नाही दृष्टी । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ १० ॥
गुरुनाम स्मरणाचा ध्वज । अखंड उभारिला तेजपुंज ॥
गुरुसेवा करिता नुपजे लाज । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ ११ ॥
अनुष्ठान गुरुमूर्तीचे ध्यान । पूजेचे मुळ ते गुरुचरण ॥
गुरुनाम मंत्र ते जपकारण । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ १२ ।
गुरुतीर्थ करी प्राशन । सदा गुरु गौरव गायन ॥
हरी गुरुरुप देखे समान । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ १३ ॥
माझे शरीर असो बहुकाळ । मज गुरुसेवा घडो निर्मळ ॥
गुरुभेटी लागी उताविळ । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ १४ ॥
गुरुनिंदा ऐकता जाण । बोट घालोनी बुजवी कान ॥
पुन्हा न पाहो त्याचे वदन । सद्‌शिष्यानी ॥ १५ ॥
जारणमारण अनुष्ठान । वादविवाद पै शुन्य ॥
कुटीलता निंदा नावडे मनातून । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ १६ ॥

अद्भुत प्रज्ञा जवळी असे । चातुर्याला हृदयी वसे ॥
अंगी सद्भाव विशेष दिसे । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ १७ ॥
सर्वस्वेसी अती उदार । गुरु कार्यासी सदा आदर ॥
लौकीकावरी नाही भार । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ १८ ॥
सदा जपे गुरुनाम । तेणे वितळे क्रोधकाम ॥
जाती लोभ मत्सर मोह भ्रम । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ १९ ॥
नाना मते कुमार्ग अनाचारी । तेथे न बैसे क्षणभरी ॥
वेदाज्ञा वंदेजी शिरी । हेचि लक्षण शिष्यांचे ॥ २० ॥
गुरु शिष्यांचे लक्षण । सांगितले बहु निवडून ॥
ही भूषणे लेइली परिपूर्ण । त्यांचे दर्शन दुर्लभचि ॥ २१ ॥

# ढोंगी गुरुत्वाचे लक्षण

सत्य लक्षण अंगी नसती । नुसतेच गुरुत्व भोगिती ॥
सदा अंतरी पापमती । त्यांची संगती न धरावी ॥ १ ॥
अंगी नसे किंचित ज्ञान । पर संगे दाविती डोलोन ॥
सरडा तुकवितो जैसी मान । त्यांची संगती न धरावी ॥ २ ॥
संतमूर्ती सदा निंदी । नुसतेच शास्त्रे प्रतिपादी ॥
कुमार्ग दावूनि भोळे भोंदी । त्यांची संगती न धरावी ॥ ३ ॥
हरीहर चरित्रे पावन सर्वथा । म्हणे हे व्यर्थ काय गाता ॥
मी सर्वात म्हणे जाणता । त्यांची संगती न धरावी ॥ ४ ॥
ना आवडे हरी कीर्तन कधी । तीर्थक्षेत्र महिमा उच्छेदी ॥
मज पुजा म्हणे सर्वा आधी । त्यांची संगती न धरावी ॥ ५ ॥
माझे शिष्य व्हा म्हणोनी । भलत्यासी आणीतसे ओढोनी ॥
नुसतेच मंत्र सांगे कर्णी । त्यांची संगती न धरावी ॥ ६ ॥
मद्यपी जैसा बडबडत । वाचाळ बळे भाविका गोवित ॥
आपुल्या अंगे नाही प्रचित । त्यांची संगती न धरावी ॥ ७ ॥
शिष्यांसी सांगे दटावून । माझे करावे बरवे पूजन ॥
नाही तर तुम्हा शापीन । त्यांची संगती न धरावी ॥ ८ ॥

म्हणे आम्ही ज्ञानी मुक्त । जाहलो सकळ कर्मातीत ॥
वेद विरुध्द तेचि स्थापित । त्यांची संगती न धरावी ॥ ९ ॥
नाही इंद्रियासी कदा शांती । जवळ कामक्रोध दुमदुमती ॥
तरलो म्हणोनी लोका सांगती । त्यांची संगती न धरावी ॥ १० ॥
प्रत्येया न येती सद्गुरु स्वरुप चित्संग । लटकेचि दावी वरते सोंग ॥
त्याचा न तुटे भवरोग । त्यांची संगती न धरावी ॥ ११ ॥
सर्पाच्या माथा मणी दिसत । तरी घेऊ जाता बहुत अनर्थ ॥
तैसा जो जाहला विद्यावंत । त्यांची संगती न धरावी ॥१२ ॥
संताची निंदा करी । देखता दु:ख नुपजे अंतरी ॥
चढला अहंकृतीच्या गडावरी । त्यांची संगती न धरावी ॥ १३ ॥
ज्ञानहीन गुरु त्याजीजे । ऐसे गुरुगीतेचे वचन गाजे ।
दयाहीन देश देखिजे । तेही त्याजीजे सर्वथा ॥ १४ ॥
स्नेहाविन बंधु वर्ग । दुर्मुखी स्त्रियेचा करिजे त्याग ॥
तैसे जे दु:ख दाविती कुमार्ग । तेही त्याजीजे सर्वथा ॥ १५ ॥

# ढोंगी लक्षणीय शिष्यांचा त्याग

शिष्य आचरती अधर्म । करिती व्यभिचारिक कर्म ॥
ज्यासी नावरती क्रोध काम । तैसे शिष्य त्याजावे ॥ १ ॥
गुरु सांगे हितोपदेश । तो ज्यासी वाटे जैसे विष ॥
गुरुहून म्हणती आम्ही विशेष । तैसे शिष्य त्याजावे ॥ २ ॥
गुरु देखता दाविती मर्यादा । मागे सदा जपती निंदा ॥
स्वामीसी प्रवर्तती जे वादा । तेही शिष्य त्याजावे ॥ ३ ॥
निंदक अभक्त जे वायस । मुखरोगचि झाला वाटे मुखास ॥
परम दोषी भक्षिती विष्टा आसमास । तेही शिष्य त्याजावे ॥ ४ ॥
दृष्टी देखता गुरु राजहंस । मनी चिडती जैसे वायस ॥
शुध्द ज्ञानीया लाविती दोष । तेही शिष्य त्याजावे ॥ ५ ॥
गुरुसेवा अंगी न होत कसवटी । गोष्टी नित्य करती चावटी ॥
वरपंगी सत्संग दावी अंतरंग कपटी । तेही शिष्य त्याजावे ॥ ६ ॥
कामक्रोधे अनावर । द्वैत रुपीचा जैसा सागर ॥
अंगी बिंबला थोर । तैसे शिष्य त्याजावे ॥ ७ ॥
ऐसे दुरात्मे जे पापमती । नाना योनी भोगिती ॥
रौरव कुंडी पडती । महादोष बळे ॥ ८ ॥
असो ऐसा जो भ्रष्टावला । तो सर्वा जैसा बहिष्कारीला ॥
तैसा तो शिष्य आपुला । न म्हणावा कदाही ॥ ९ ॥

# सद्‌गुरु कृपा स्फुरण (शास्त्रानुभुती)

आता ऐका सद्‌गुरु कृपा स्फुरण कैसे । स्वसुखी असता गुरु परमपुरुषें ॥
तेथे अहं ब्रह्मास्मी ध्वनी विशेष । उठती झाली स्वरुपी ॥ १ ॥
जैसे सागरी उठे लहरी । तैसी कृपेध्वनी उठती चिद् अंबरी ॥
की, पहुडला सुख शेजेवरी । तो जागा होई स्वईच्छे ॥ २ ॥
मुळी उठली जी ध्वनी । परम पुरूषापासूनी ॥
प्रकृती म्हणती तिजलागुनी । आदि जननी ज्ञानकळा ॥ ३ ॥
जैसा दीप आणि ज्योती । की, ज्ञानकळा कुंभ निश्चिती ॥
अभेद ती स्थीती । न मोडे कदापि ॥ ४ ॥
की, तरंग आणि नीर । की, तंतु आणि वस्त्र ॥
की, धातू आणि पात्र । लोह आणि शस्त्र अभेद जैसी ॥ ५ ॥
गुळ आणि गोडी अभेद । की वाद्य आणि नाद अभेद ॥
की, ओंकार आणि ध्वनी विशेद । एकरुपे वर्तती ॥ ६ ॥
जैसी प्रकृती पुरुष निर्धारी । अभेद रुप निर्विकारी ॥
तिच्या पोटी इच्छा शक्ती सुंदरी । जाहली गुणक्षोभिनी ॥ ७ ॥

इच्छादेवी कर्ण कुमारी । पुरुष सत्ते जाहली गरोदरी ॥
सृष्टी करावी अंतरी । अहं वृत्ती धरिली तिने ॥ ८ ॥
तिन्ही देव त्रिविध अहंकार । तिज पासोनि जाहले साचार ॥
त्रिशक्ती स्वरुपे चतुर । तेचि जाहली ती ठायी ॥ ९ ॥
सत्वगुणे ज्ञानशक्ती जाहली । रजोगुणे क्रिया शक्ती विरुढली ॥
तमोगुणे द्रव्यशक्ति बोलिली । तिन्ही नटलीस्वरुपे ॥ १० ॥
द्रव्यशक्ती आधारे पंचगुण । पंचविषय निर्मीले जाण ॥
शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध गुण । पंच तंन्मात्रायाच पै ॥११ ॥
क्रिया शक्तीच्या सहवासे करुन । रजोगुण व्यापलासे पंचके तीन ॥
ज्ञानेंद्रिये पंचक पहिले पूर्ण । कर्मेद्रियें पंचक दुसरे पै ॥ १२ ॥
प्राणपंचक तिसरे । आता सत्वज्ञान शक्ती आधारे ॥
अंत:करण पंचक एकसरे । ज्ञानमय ओतीले ॥ १३ ॥
ऐसी पंच पंचके विशेष । ती मिळाली परम्परानु प्रवेशे ॥
मग कर्दम करुनि परमपुरुषे । दोन विभाग पै केले ॥ १४ ॥
उत्तम भाग तो हिरण्यगर्भ केवळ । असार भाग विराट ढिसाळ ॥
पंचभूतात्मक निखीळ । पिंड ब्रह्मांड रचियेले ॥ १५ ॥

जैसी पाऱ्याची कोठी फुटली । तेथे कोट्यावधी खाळ जाहली ॥
की, अग्री स्फुलींग कल्लोळी । बहुत जैसा पसरला ॥ १६ ॥
की, आकाशी मेघ एकधार सोडी । त्याचे बिंदू होती लक्ष कोटी ॥
अहंध्वनी सरीसे परवडी । जीव उठीले अपार ॥ १७ ॥
जीव, शिव हे दोन्ही पक्षी । बैसले या प्रपंच वृक्षी ॥
शिवपूर्ण ज्ञानी सर्व साक्षी । जीव लक्षी विषयाते ॥ १८ ॥
तेथे जीवासी जाहला भ्रम । विसरला आपुले निजधाम ॥
चौऱ्यांशी लक्ष योनी ग्राम । हिंडता कष्टी होतसे ॥ १९ ॥
त्या जीवाची करावया सोडवण । गुरुदेव झालेसे सगुण ॥
त्यांच्या कृपा अवलोकने करुन । जीव सफल उध्दरीती ॥ २० ॥
तो सर्वातील सर्व श्रेष्ठ । त्याहुनी कोणी नाही वरिष्ठ ॥
त्यांच्या मायेचा खेळ उत्कृष्ट । हा जगडंबर पसारा ॥ २१ ॥
स्थूल, लिंग, कारण, महाकारण । विराट हिरण्यगर्भ चालकपूर्ण ॥
महातत्व मायेहूनी भिन्न । स्वरुप निर्वाण वेगळे असे ॥ २२ ॥
जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या । सृष्टी, स्थिती, प्रलय, सर्व साक्षीणी माया ॥
याहुनी स्वरुप वेगळे सखया । गुरु उपदेशिती आपणाते ॥ २३ ॥

विश्व तेजस प्राज्ञ प्रत्यगात्मा । ब्रह्मा, विष्णु, रुद्र, परमात्मा ॥
याहुनि वेगळा तो आत्मा । असे गुरुरुप ॥ २४ ॥
नेत्र कंठ हृदय मून्धि । सूर्य ज्योतिर्लोकादि करुनी ॥
महर्लोक ब्रह्मस्थानी । याहुनी वेगळे स्वरुप पै ॥ २५ ॥
अकार, उकार, मकार । तिन्ही मिळोनी पूर्ण ओंकार ॥
त्याहुनी स्वरुप निर्विकार । वेगळेची पै गुरु दाविती ॥ २६ ॥
रज, सत्व, तमोगुण । चौथा शुध्द सत्व निरसोन ॥
सच्चिदानंद निर्वाण । स्वरुप पै ॥ २७ ॥
वैखरी , मध्यमा, पशयंति, परा । चहू वाचतीत अक्षराक्षर परा ॥
तोचि तू परात्पर सोयरा । सकळांचा जाहला ॥ २८ ॥
जारज, अंडज, उभ्दिज । चौथी खाणी नाव स्वदेज ॥
त्याहुनी वेगळा तू तेजपूंज । निरामय ॥ २९ ॥
ऋग्वेद, यजूर्वेद, सामवेद । चौथा अथर्ववेद प्रसिध्द ॥
त्याहुनी वेगळा ब्रह्मानंद । स्वरुप ऐसे गुरु दाविती ॥ ३० ॥
स्थूळ प्रविविक्त स्वरुपभाव । स्वरुपानंदादी भोग सर्व ॥
त्याहुनी वेगळा स्वयंममेव । सत्य जाणावे ॥ ३१ ॥

सलोकता, समीपता। स्वरुपता सगुण सायुज्ञता ॥
त्याहुनी वेगळा स्वरुप तत्वता। सद्‌गुरुदेव दावितसे ॥ ३२ ॥
द्वैत, अद्वैत, महाद्वैत। भूनीर, अनळ, अनिळ नामातित ॥
तोचि सद्‌गुरु कृपा पुर्ण ब्रह्माशाश्वत। जाणावे स्वठायी ॥ ३३ ॥
सर्वांचे जे का कारण। अविद्या चातुर्य अज्ञान ॥
हा आनंदमय कोष याहूनी भिन्न। स्वरुप जाणावे ॥ ३४ ॥
साकार, साभास, आभास। चोथे जाणिजे निराभास ॥
याहुनी परांत्पर हंस। सत्य गुरुदेव दाविती ॥ ३५ ॥
महा प्रलय ते मरण। स्थूलदेह जाय नासोन ॥
षड्‌विकार रहीतपूर्ण। सत्य स्वरुप दावी गुरुदेव कृपे ॥ ३६ ॥
असो लहानुजी नाथे कृपा कल्लोळे। ही हाता आली अमृत फळे ॥
दास म्हणे बहूत रसाळे। संत सज्ञनी सेविजे ॥ ३७ ॥

# सद्गुरु स्तवन

जीव ब्रह्मवि होय । सत्य हेचि बोलणे आहे ॥
सर्वही पाप ताप जाय । सद्गुरुचे सुयोगे ॥ १ ॥
गुरुचे चरणतीर्थासी जो गेला । तो सकळ तीर्थी न्हाला ॥
कृत कृतार्थ झाला । भक्तराज तो ॥ २ ॥
सकळ पापाचे दहन । अज्ञानाचे उन्मुलन ॥
भवसिंधुचे उल्लंघन । ते सद्गुरु तीर्थराज असे ॥ ३ ॥
तीर्थसेवते जाण । वैराग्यासहित होय ज्ञान ॥
जन्मकर्म निवारण । पदोदके गुरुच्या ॥ ४ ॥
आधि गुरुदेव भोजन । मग घेईजे अन्नपान ॥
तेचि गुरुउच्छिष्ट भोजन । यथाक्रमे ॥ ५ ॥
गुरुमुर्तीचे ध्यान । करावे स्तोत्र पठन ॥
गुरुचे निवासस्थान । तेचि निवास काशी हो ॥ ६ ॥
गुरु चरणीचे जळ । ते भागेरथीच केवळ ॥
सद्गुरु तो केवळ । महाज्योतिर्लींग असे ॥ ७ ॥

सद्गुरु चरणी मस्तक ठेवोन । तोचि अक्षयी वट जाण ॥
प्रयाग तीर्थराज गहन । चिन्मय मुर्ती गुरुच होय ॥ ८ ॥
निश्चय निरुते जाण । समस्त पुज्य गुरुचे भजन ॥
गुरु वेगळे तत्व ज्ञान । नसे परत्रयी ॥ ९ ॥
आसन, शयन, वाहन । वरचे अलंकार भूषण ॥
साधके करावे निवेदन । जेणे गुरुचे मन संतोषे ॥ १० ॥
आपुले जे जीवित । धनदारा सकळ वित्त ॥
देहप्राणादि समस्त । करावे निवेदन ॥ ११ ॥
शरीर देह विचारीता । कृमी कीटक दुर्गंधता ॥
मळमुत्र श्लेष्मता । पार नाही ॥ १२ ॥
अस्थिमासाचा गोळा । आठविता वाटे कंटाळा ॥
गुरु भजने सार्थक झाला । तरीच बरवे या देही ॥ १३ ॥
सांडूनी लाज लौकिकांची । नमस्कारा सद्गुरुशी ॥
काया वाचा मनाची । एकनिष्ठा ॥ १४ ॥
संसार वृक्षी वेधले । पतनालागी जैसे नुगले ॥
नरकसागरा पासूनी रक्षिले । सद्गुरु कृपावंते ॥ १५ ॥

ब्रह्मा, विष्णु, महेश्वर। हे ही गुरुचे अवतार ॥
गुरु सर्वही चराचर। परब्रह्म अंश असे ॥ १६ ॥
अज्ञान नेत्र लागले। ज्ञान भांडार उघडीले ॥
तया गुरुची पाऊले। देखिली हो ॥ १७ ॥
व्योमातीत अखंड। मंडलाकार निबीढ ॥
व्यापूनि सकळ ब्रह्मांड। भरीलेची दिसे ॥ १८ ॥
सकळ श्रृतिचे रत्नभूषण। गुरुपद कमळ जाण ॥
वेदांना अंबुज उत्फुल्लन। सूर्याचि जैसे ॥ १९ ॥
तया माझेचि मन। तारी जयाचे स्मरण ॥
उपजो लागे ज्ञान। संपदे सहीत ॥ २० ॥
चैतन्य सशांत। पूर्ण निरंजन व्योमातीत ॥
नादबिंदु कळारहित। अगोचर जे ॥ २१ ॥
स्थावर जंगम चराचर। व्योमातीत निराकार ॥
नमन माझे निरंतर। यथा श्री गुरुदेवाते ॥ २२ ॥
ज्ञानशक्ती आरुढला। तत्व विभुषणे शोभला ॥
ब्रह्मांड मानी गगनमाळा। शोभितो तया ॥ २३ ॥
मग तो भुक्तिमुक्तिचा दाता। अनेक कर्मबंध छेदिता ॥
जीवा ज्ञान प्रभाविता। तारी स्वये ॥ २४ ॥

भवसिंधूचे शोषण । करिते जैसे संदीपन ॥
गुरुतीर्थाचे महिमान । रामकृष्णादि आणि कर्ण जाणे ॥ २५ ॥
गुरुविना आणिक । तत्व नसे गा तारक ॥
तप अनुष्ठानादिक । गुरुच सर्व होय ॥ २६ ॥
जो माझा स्वामी गुरुनाथ । तोचि जगाचा निश्चित ॥
सर्वात्मा जैसा विश्वनाथ । तैसे गुरुच जाहले सर्वही ॥ २७ ॥
ध्यान मुळ गुरुमूर्ती । पुजा मुळ गुरुचे चरण असती ॥
मंत्र मुळ वाक्य स्थिती । मोक्ष मुळ गुरुकृपा ॥ २८ ॥
गुरु आदी अनादि । गुरुच सर्व देत बुध्दी ॥
गुरुच सर्व विधान विधी । जप जाप्य सर्वही ॥ २९ ॥
ब्रह्मांडी तीर्थे असती । ती सर्व सागरी मिळती ॥
तिही सरी न पावती । गुरुचे चरणकमलतुल्य ॥ ३० ॥
सहस्त्राशे करुन । तीर्थे न पुरती जाण ॥
ब्रह्मा, विष्णु, इशान । सर्वही जे जे असे ॥ ३१ ॥
गुरुच सर्व अंशे । जगदाकार तोचि दिसे ॥
म्हणोनी निश्चयी मानसे । तोचि भजावा ॥ ३२ ॥
ज्ञान विज्ञान सहित । गुरुभजने प्राप्त होत ॥
ते निशब्दे गर्जत । श्रृति स्वये ॥ ३३ ॥

गुरुप्रसादे करुन । देव गंधर्व पितृगण ॥
यक्ष सिध्द चारण । ईश्वरादिक सर्व ॥ ३४ ॥
सर्वचि आपुले डोई । परंतु भक्तिची गरज नाही ॥
गुरुप्रसादे विजयी । ठाऊके नसे ॥ ३५ ॥
अहंकार गर्व करुन । संसार कुहरी आगमन ॥
विद्या तपबळे जाण । निमग्न असे ॥ ३६ ॥
गंधर्व देव पितर । सिध्द चरण यक्ष किन्नर ॥
सुटका न पावती नर । याचि लागी ॥ ३७ ॥
गुरुसेवा नेणती । म्हणूनीच यातायाती ॥
असो पुढे नित्यानित्ती । ध्यानादिकी असावे मन ॥ ३८ ॥
जे ऐकता गुरुध्यान । परमानंद पावे मन ।
संसार दु:ख गहन । नसे सर्वथा त्यालागी ॥ ३९ ॥
भुक्ति  मुक्ति कारण । सकळ सुखाचे विधान ॥
श्रवण मात्रे पावन । करी रोकडे ॥ ४० ॥
श्रीमंत गुरु हेचि वचन । ब्रह्म हेचि भजन ॥
तयाते विस्मरण । नमन करीन सत्याते ॥ ४१ ॥
ब्रह्मानंद मूर्ती । परमसुखाची प्राप्ती ॥
सुखदु:खाची शांती । मनोपम ॥ ४२ ॥

अचळ अमळ गुण रहीत । सर्व बुध्दीत साक्षीभूत ।।
भावभाव विगत । नमन माझे तया लागी ।। ४३ ।।
हृदय कमला भितरी । पाकोळीकांचे उदरी ।।
मध्ये सिंहासनावरी । दिव्यमूर्ती पहावे ।। ४४ ।।
आनंदे करावे दर्शन । ज्ञान स्वरुप संपन्न ।।
बोधरुपे पावन । कृपामूर्ती ।। ४५ ।।
नित्य शुध्द निरंजन । निराभास विकार दहन ।।
नित्यबोध चिदानंदघन । गुरुदेव ऐसा असे ।। ४६ ।।
योगी स्तविती जया । अमृत केवळ भवरोगीया ।।
जैसी श्रृति आणिलीया । निग्रहानुग्रहाते ।। ४७ ।।
त्या गुरुचे चरण । सदा ध्यानी असावे जाण ।।
महादोष निर्दाळन । स्वये करिती ।। ४८ ।।
गुरुहूनी अधिक । त्रिवाच्या नसे आणिक ।।
शिव जीवही आज्ञाधारक । गुरुच्या उपदेशा ।। ४९ ।।
तो तेथेचि जाणे कल्याण । त्रिवाच्या माझे सिंहासन ।।
ऐसे करिता भजन । ज्ञान उपजे स्वये ।। ५० ।।
मग श्री मुक्त ही भावना । शिष्य करावे वाटे मना ।।
दाविले मार्ग अंतःकरणा । शुध्द करोनिया ।। ५१ ।।

अनित्य ते सर्व निरसावे । सत्य ते साह्य व्हावे ॥
ज्ञान अज्ञान स्वभावे । समस्थिती ॥ ५२ ॥
ऐसे असता पावती । गुरु निंदा जे करती ॥
ते घोर नरकी पावती । यावच्चंद्रदिवाकरो ॥ ५३ ॥
जोवरी देही वर्तत । तोवरी गुरु भजावा समर्थ ॥
गुरुचा जो लोभ भक्त । न करिती जनी ॥ ५४ ॥
असत्य बोलणे गुरुशी । अहंकार यावा दासी ॥
गुरुते गोवी परियेसी । जाण निजबळे ॥ ५५ ॥
ऐसे निर्जल स्थळीचे पुरुष । चिरकाल होय ब्रह्म राक्षस ॥
मग अंती पावे तामस । नाना योनी ॥ ५६ ॥
मुनियाचा श्राप झाला । देवपन्नगी ग्रासिला ॥
गुरु रक्षि तयाला । काळ, मृत्यु, भया पासूनी ॥ ५७ ॥
आणि गुरुचा जो श्रापिला । कवनहीन रक्षी तयाला ॥
ईश्वर ही परी झाला । अशक्त तेथे ॥ ५८ ॥
म्हणोनी गुरुमंत्र रोज स्मरण । वेदवाक्य समान ॥
केवळ जे गुरुजन । श्रृति स्मृती आगळे ॥ ५९ ॥
मग तोचि जाणावा संन्यासी । की विनटला गुरु पदासी ॥
इतर मिरवी वेषाशी । ते न म्हणावे योगी हो ॥ ६० ॥

जैसे सर्वत्र निर्वीकार । परब्रह्म व्यापक अक्षर ॥
तेचि गुरुचे साचार । देह असे ॥ ६१ ॥
गुरुकृपेने आत्माराम । लाभ होय परम ॥
स्वत: हा ज्ञानाचा आगम । तेचि सद्गुरु कृपा ॥ ६२ ॥
आब्रह्मा पासोनि जाण । जीव जे जे अनुमान ॥
स्थावर जंगम संपुर्ण । गुरुच होय ॥ ६३ ॥
सच्चिदानंद सदोदीत । निर्गुण निरंजन आणि सत ॥
परात्पर देह समस्त । गुरुच होय ॥ ६४ ॥
हृदयाकाशी निर्मळ । स्फटीक जैसा सोज्वळ ॥
की दर्पणीचे केवळ । झळकीले ॥ ६५ ॥
अंगुष्ठमात्र प्रमाण । जे करावे ध्यान ॥
चिन्मय स्फुरण । भवतारक असे ॥ ६६ ॥
अज्ञान सांडोन । निर्विकल्प करावे मन ॥
अगोचर जे निरंजन । तेचि ध्यान गुरुरुप ॥ ६७ ॥
निजस्वभावे कर्पुर । शितोष्णाहूनी परंपार ॥
की, कुंकुम, पित्‌रंगाकार । ब्रह्म नीळ त्या माजी ॥ ६८ ॥
आपण तैसेचि व्हावे । एकत्रयीच असावे ॥
भृंगीकिटकन्याय ध्यावे । स्वरुप गुरुचे ॥ ६९ ॥

होऊनिया निर्मळ शांत। सर्वत्र सर्वदा उदास ॥
वसे तो पुण्य देश। जनी सर्व ॥ ७० ॥
ऐसी गुरु भक्ताची लक्षणे। निरोपिली तुम्हाकारणे ॥
उपदेश मार्गे येणे। गुरुध्यानादिक सर्वही ॥ ७१ ॥
गुरु माता गुरु पिता। गुरुदेव स्वजन भ्राता ॥
कोटी पुज्य संतोषिता। गुरुदेवाचिया स्वरुपि ॥ ७२ ॥
विद्या धन गर्वित। गुरु ते जे न मानित ॥
ते यमपुरीचे अंकीत। जाणावे करंटे ॥ ७३ ॥
असे संत भक्ताचे महिमान। कवण करु शके वर्णन ॥
भावे करिता स्मरण। भवबंधन कैसे तया ॥ ७४ ॥
या ग्रंथासी सद्गुरुचा वर। वाचक हो निरंतर ॥
जे बोलविले अक्षर। तेचि सत्वर लिहिता झालो ॥ ७५ ॥
या ग्रंथाचा इतिहास। स्वरे वर्णिता हृषीकेश ॥
करणे न लागेचि सायास। अपयश, यश तोचि जाणे ॥ ७६ ॥
येरवी माझी बुध्दि दिसे। हे तो सर्वा माहिती असे ॥
बोलु जाता मती भ्रमतते। हे येतसे प्रत्यया ॥ ७७ ॥
सागरीचे घेऊनिया जिवन। तयासीच करावे अर्ध्यदान ॥
तैसे माझे अरुच्य वचन। संतजन गोड करिती ॥ ७८ ॥

गुरुचे चरित्र निश्चिती । वदाविले मी तयाचे कृपादृष्टी ॥
तेचि परिसावी संतश्रृति । एकचित्ती करोनिया ॥ ७९ ॥
सद्‌गुरु महिमामृत कथा । ऐकता निवारे भवभय व्यथा ॥
क्लेश संकटाची वार्ता । सर्वर्था ती न रिघे ॥ ८० ॥
या ग्रंथाचे आवर्तन । मनोभावे करिता जाण ॥
इच्छा होतील परीपूर्ण । पंचावर्तन पुर्णरोग जाय शरीराचा ॥ ८१ ॥
आवर्तन होता एकादशशत । पोटी होय दिव्य सुत ॥
आवर्तन होता एकविस शत । तया धन प्राप्ती यथार्थ मिळेल पै ॥ ८२ ॥
परी हे भावाचे कारण । नित्य भावे करा श्रवण पठण ॥
भावोचि गृही वाढेल धन । भावेचि यथामति सर्व होय ॥ ८३ ॥
तरी सोमवारी अथवा गुरुवारी । भावे खेळु द्या वैखरी वरी ॥
परीवर्तने होईल शरीरी । संदेह नाही ॥ ८४ ॥
असे हे पुण्य आख्यान । जे नर पठती करिती श्रवण ॥
तयाही सकळ घडेल पुण्य । शुध्द आचार भावे ॥ ८५ ॥
सकळ विघ्ने दूर करी । अष्ट सिध्दी आणी घरी ॥
तो सद्‌गुरु निर्धारी । स्मरण होता सर्वकाळ ॥ ८६ ॥

महाव्याधि नासती । मंत्रोनी लाविता विभूती ॥
राजेही वश होती । नासती शत्रु ॥ ८७ ॥
आसनी सर्वासनी । अथवा शुभ्र कमलासनी ॥
चित्ते निष्काम होऊनी । जपावे गुरु महिमामृत ॥ ८८ ॥
दोन्ही कर जोडूनी आता । सद्गुरु पायी ठेवीतो माथा ॥
विनवीतो सकळ संत श्रोता वक्ता । प्रमादरे करुनिया ॥ ८९ ॥
इतिश्री सद्गुरु महिमामृत ग्रंथ । ऐकीता संतुष्टे श्री जगन्नाथ ॥
श्रवणे पुरवि मनोरथ । भाविकांचे ॥ ९० ॥

शुभं भवतु
श्री सद्गुरुपदार्पणमस्तु
श्री सद्गुरु महिमामृत संपुर्णम्
श्री समर्थ लहानुजी महाराज की जय

: समाप्त :

# आरती

(चाल : आरती ज्ञानराजा)

आरती गुरुनाथा । जगद्‌गुरु जगन्नाथा ॥
जीवेभावे ओवाळीतो । चरणी ठेवीतसे माथा ॥ धृ ॥
एकविस स्वर्गावरी । गुरुनाथा तुझी स्वारी ।
चौदा भुवने प्रकाशिता । भक्तातारी दिनानाथा ॥ १ ॥
सहस्त्रदल कमलावरी । शुक्लांबर वस्त्रधारी ।
षड्‌चक्री तुची बापा । मज वाटसी अनंता ॥ २ ॥
सद्‌चित्ता आनंदा । आत्मारामा सुखकंदा ।
भवसागरी तारीयले । करुणाकरा जगन्नाथा ॥ ३ ॥
प्राणापाण काया वाणी । सोऽहं भावे अर्पोनी ।
चिन्मय मूर्ती तुझी । ध्यानी येती आदि अंता ॥ ४ ॥
तुझ्या स्मरणे निजध्यास । होईतव ज्ञानाचा प्रकाश ।
अनुहद वाद्याचा । समाधी भास होई चित्ता ॥ ५ ॥
ज्ञानमंत्र पुष्पांजलि । अर्पितो गुरु कमली ।
तीर्थ - प्रसाद सेवोनिया - पावे आनंद स्वरुपा ॥ ६ ॥
दास तुझा मी अंकीत । भावे आलो शरणांगता ।
घडो अखण्ड चरण सेवा । हेची मागणे समर्था ॥ ७ ॥

॥ श्री परमहंस लहानुजीनाथ प्रसन्न ॥

# ॥ निवेदन ॥

परमहंस श्री संत शंकर हा **''सदगुरू महिमामृत''** ग्रंथ प्रातःसमयी पठनासाठी सादर करून गृहस्थाश्रमातील संतप्रेमी, मुमुक्ष, जिज्ञासु व भाविक वृंदावर अतीव उपकार करून ठेवले आहे.

या ग्रंथ पठनाच्या नित्य परिपाठामुळे भक्तीमार्गातील लोकांच्या हृदयाचे परिवर्तन होवून अंतःकरण शुद्ध व पवित्र होईल. तसेंच गुरूचरणी लीन झाल्याचा परमानंद निश्चितच यथावकाश अनुभवास येईल व जीवन परमार्थमय बनेल

भाविक लोकांच्या विशेष आग्रहास्तव या ग्रंथाची तृतीय प्रकाशित करावी लागत होईल.

विश्वस्त

श्री संत शंकर महाराज आश्रम (ट्रस्ट)

श्री क्षेत्र, पिंपळखुटा, ता. धामणगांव, जि. अमरावती

दिनांक : १८.०३.९९



**वं. श्री संत शंकर महाराज सद्गुरू**

आटवुनीया पंचभूते। द्रष्टा, दृश्य दर्शन त्रिपुटे।
जाणोनिया साक्षभूते। आत्मस्वरूपी जाहला।।

## परमहंस श्री समर्थ लहानुजी महाराज

श्री क्षेत्र - टाकरखेड

